पुणे महानगर परिवहन महामंडळ लि

प्रेस नोट

पुणे शहरातील दुचाकी व चारचाकी व इतर वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना, महिलांना, पोलीसांना या वाहतूक समस्येचा खुप त्रास सहन करावा लागत आहे. वाहतूकीच्या समस्येतुन मुक्त होण्यासाठी तसेच प्रदुषण कमी होण्यासाठी शहरातील नागरिकांना सार्वजनिक बस सेवेचा वापर करणे आवश्यक आहे. शहरातील नागरिकांनी सार्वजनिक बस सेवेचा वापर केल्यास दुचाकी व चारचाकी वाहनांची संख्या कमी होण्यास मदत होईल.

मा.स्थायी समिती ठराव क्र.१५२१ दिनांक १५/१०/२०१६ व पुणे म.न.पा. मुख्य सभा ठराव क्र.८२२ दिनांक २१/१२/२०१६ ची मान्यता विचारात घेवुन मा.महापौर, पुणे म.न.पा. यांनी दिनांक २८/०२/२०११ च्या पत्रान्वये प्रायोगिक तत्वावर शहरातील सर्व तेजस्विनी या महिलांसाठीच्या बस सेवा दिनांक ०८ मार्च २०११ रोजीचे जागतिक महिला दिना निमित्त प्रवास करणाऱ्या महिलांकरीता मोफत करणेबाबत पत्र व्यवहार केला होता. त्या अनुषंगाने या संदर्भात महामंडळ प्रशासनाने मा.संचालक मंडळाकडे प्रस्ताव सादर केलेला होता व सदर प्रस्तावास मा.संचालक मंडळाने आज रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार दिनांक ०८ मार्च २०११ जागतिक महिला दिने व प्रत्येक महिन्यातील ०८ तारखेस तेजस्विनी मधुन प्रवास करण्याऱ्या महिलांकरीता सदर सेवा मोफत राहणार आहे.सदर मोफत सेवेमुळे येणारी तुट ही महापालिकेकडुन संचलन तुटीतुन प्राप्त होणार आहे.

खालील प्रमाणे सद्या तेजस्विनी मार्ग पी.एम.पी.एम.एल.मार्फत संचलित होत आहे.

| अ.क्र. | मार्ग क्र. | पासूनपर्यंत | बससंख्या | खेपा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | कात्रज ते शिवाजीनगर | ४ | ६४ |
| २ | १३ | अप्पर डेपो ते शिवाजीनगर | २ | ३२ |
| ३ | २४ | कात्रज ते म.हौ.बोर्ड | ४ | ४८ |
| ४ | ६४ | हडपसर ते वारजेमाळवाडी | ४ | ३२ |
| ५ | १०३ | कोथरूड ते कात्रज | ४ | ४८ |
| ६ | १११ | भेकराईनगर ते मनपा | ४ | ३२ |
| ७ | ११७ | स्वारगेट ते धायरी मारूत्ती मंदिर | २ | ३२ |
| ८ | १५८ | मनपा ते लोहगाव | २ | ३२ |
| ९ | १६१ | मनपा ते वडगाव शेरी | २ | २४ |
| १० | ११ | माकेटयार्ड ते पिंपळे गुरव | १ | १२ |
| ११ | ११३ | अब चौक ते सांगवी | २ | ४० |
| १२ | १५१ | मनपा ते आळंदी | १ | ६ |
| १३ | ३२२ | मनपा ते आकुर्डी रेल्वे स्टेशन/पिंपळे सौदागर | ३ | २६ |
| १४ | ३७२ | निगडी ते हिंजवडी माण फेज-३ | ३ | ३६ |
| | **एकूण** | | **३८** | **४६४** |

मार्च २०१८ ते मार्च २०१९ या कालावधीमध्ये तेजस्विनी बस मधुन प्रति महिना २.३३ लाख व वर्षभरात २८ लाख महिलांनी प्रवास केलेला आहे. तसेच तेजस्विनी महिला बसेसचे प्रति महा उत्पन्न रूपये ३४,३७,६८२/- इतके असून वार्षिक उत्पन्न रूपये ४,१२,५२,१८४/- प्राप्त झाले आहे व ईपीके रूपये ३३.०० इतका आहे. अशा प्रकारे तेजस्विनी महिला बसेसमध्ये महिला वाहकाची नेमणुक असून तेजस्विनी बसेसमुळे महिलांना सुरक्षित व सुखकर प्रवास होत आहे. तसेच माहे सप्टेंबर २०१८ पासुन महिला दामिनी तिकीट तपासणी पथकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच गर्दीच्या मार्गावरील प्रवाशांचा प्रतिसाद विचारात घेवुन भविष्यामध्ये अशा मार्गांवर २५ ते ३० तेजस्विनी बसेसची वाढ करण्याचे नियोजन आहे.

वाहतुक व्यवस्थापक
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
पुणे दिनांक /०२/२०१९

मा. संपादक ,
दैनिक ..................
........................ यांसी,

स.न.वि.वि

कृपया वरील वृत्त नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये प्रसिध्द करावे अशी विनंती आहे.

मा. स.कळावे

आपला विश्वासू

कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.